# कार्यमग्न अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर

एन. डी. आपटे

उत्तम बुध्दिमत्ता, गणित व संख्याशास्त्र यांच्या आधारे प्रदीर्घ काळ केलेला अनेक अर्थशास्त्रीय व सामाजिक प्रश्नांचा अभ्यास, कुतुहलापोटी इतर काही ज्ञानशाखांचाही केलेला अभ्यास, प्रागतिक विचारसरणी, स्पष्टवक्तेपणा, स्वच्छ सार्वजनिक चारित्र्य व साधी राहणी ही प्रा. वि.म.दांडेकरांच्या व्यक्तिमत्वाची ठळक वैशिष्टये. त्यांची लोकप्रियता व त्यांचा नैतिक दरारा या गोष्टींचे रहस्य याच गुणात आहे. आज भारतातील नामवंत अर्थशास्त्रज्ञांत व विचारवंतात त्यांची गणना होते. भारत सरकारला व सरकारी संस्थांनाही त्यांचा सल्ला मोलाचा वाटतो. पण मला हे सांगायचय की याच गुणांमुळे त्यानी सामान्य माणसाच्या मनातही फार आदराचे स्थान मिळवले आहे. आणि म्हणूनच प्रचलित आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या पुष्कळ कार्यक्रमांना प्रमुख वक्ते म्हणून प्रा. दांडेकराना बोलावले जाते, व तेथे त्यांची परखड मते ऐकण्यासाठी लोक गर्दी करतात. सहकार, बँकिंग, शेती, शिक्षण अशा विविध क्षेत्रात त्यांना

**आमच्या भारतीय परंपरेत ज्ञानोपासना व साधी राहणी या दोन गोष्टींना फार महत्व दिलेले आहे. हीच आमची ऋषिपरंपरा. अशा आमच्या भारतीय परंपरेशी सुसंगत असणारे एक व्यक्तिमत्व म्हणजे प्राध्यापक विनायक महादेव दांडेकर.**



प्रा. वि. म. दाण्डेकर

मानणारी असंख्य मंडळी आहेत.

प्रा. दांडेकरांच्या सार्वजनिक आयुष्याचा किवा त्यांच्या संशोधन कार्याचा पट मांडणे हा माझ्या या लेखाचा उद्देश नाही. कारण या क्षेत्रातील त्यांची कामगिरी सुपरिचित आहे. प्रा. दांडेकरांच्या खाजगी आयुष्यातीलही कित्येक घटना उदबोधक आहेत. त्यातही नाट्य आहे. यापैकी काही उलगडवून दाखवणे हा या लेखाचा हेतू आहे.

वास्तविक 'मी स्वतःला अलिप्त ठेवू इच्छिणारा माणूस आहे असे मला सांगून प्रा. दांडेकरानी प्रथम मुलाखतीस नकार दिला होता. पण शेवटी ते माझ्या आर्जवी आग्रहाला बळी पडले, व मला पर्वणी समान वाटणारी ही मुलाखत मिळून गेली.

एकदा मुलाखत द्यायचे कबूल केल्यावर मात्र प्रा.दांडेकरानी त्यांच्या आयुष्याची आजपर्यंतची वाटचाल बारीक सारीक तपशिलांसह मोकळेपणे माझ्यापुढे ठेवली. या लेखात प्रथम मी प्रा. दांडेकर यांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगितलेली माहिती, 'माहिती' या स्वरूपातच देणार आहे. पण माझ्या काही प्रश्नांना त्यांनी

जी उत्तरे दिली ती मात्र नंतर 'संवाद' रुपाने देणार आहे. प्रा. दांडेकरांचा जन्म ६ जुलै १९२० या दिवशी सातारा येथे झाला.

त्यांचे वडील फॉरेस्ट रेंजर होते. साताऱ्यातील प्रा.दांडेकरांचे वास्तव्य फारच अल्पकालीन ठरले. कारण त्यांच्या जन्मानंतर एक किवां दीड वर्षानीच ते आपल्या कुटुंबियांसमवेत जव्हार संस्थानात राहण्यासाठी गेले. तेथेही ते फार काळ राहू शकले नाहीत. कारण ते दोन वर्षाचे असतानाच त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले आणि त्यांच्या बर्वे नावाच्या एक आत्याबाई त्यांना विदर्भातील पुलगांव येथील आपल्या घरी घेऊन गेल्या. पुलगांवला एक मिलमध्ये त्यांचा आतेभाऊ मॅनेजर होता. वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत त्या मिलच्या आवारातच दांडेकराचे वास्तव्य झाले. त्यानंतर त्यांचा मुक्काम नागपूरला हलला. दांडेकराचे मराठी चौथीपर्यंतचे सर्व प्राथमिक शिक्षण नागपूरलाच झाले. यानंतर त्यांच्या आतेभावाने पुण्याला राजाबहादुर मिलमध्ये नोकरी घेतली आणि त्या कुंटुबाबरोबरच वयाच्या ९ व्या वर्षी दांडेकर पुण्याला आले. दांडेकरांचे यानंतरचे सर्व शालेय शिक्षण - म्हणजे इंग्रजी १ ली ते मॅट्रिक पर्यंतचे सात वर्षाचे शिक्षण - पुण्यातील सुप्रसिध्द नू.म.वि. शाळेत झाले. (१९२९-३० ते १९३६-३७ हा काळ)

नु.म.वि.त असतानाच्या काही आठवणी सांगताना प्रा. दांडेकर म्हणाले, "हायस्कूलमध्ये मला प्रभावित करणारे दोन शिक्षक म्हणजे संस्कृतचे श्री. फणसे व मराठीचे श्री. पु. ग. सहस्त्रबुध्दे श्री. फणसे हे मॅट्रिकला संस्कृत विषयासाठी असणाऱ्या जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीसाठी काही विद्यार्थ्यांची विशेष तयारी करून घेत. यासाठी त्यानी निवडलेल्या विद्यार्थ्यात मी पण होतो. पण १९३५ साली मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात दाखल झालो होतो. माझे इतरही काही व्याप असत. तेव्हा नुसते संस्कृत करत बसणे मला जमणार नाही, असे मी त्यांना स्पष्टपणे सांगितले. तेव्हा रागाने त्यानी माझ्या थोबाडीत ठेऊन दिली. पण राग शांत होताच माझ्याकडे एक बेसनाचा लाडु पाठवून दिला." या विषयाच्या संदर्भात प्रा दांडेकरांनी आणिक दोन गोष्टींचा उल्लेख केला. त्यापैकी एक म्हणजे त्यावेळी नुमवित असणाऱ्या दोन हजार विद्यार्थ्यांपैकी जवळजवळ दीड हजार विद्यार्थी संघात जात असत. दुसरी म्हणजे दांडेकर मॅट्रिकला बसले त्यावर्षी धानोरकर या विद्यार्थ्यास संस्कृतमध्ये सर्वात जास्त मार्क होते, पण तो मॅट्रिकला नापास झाल्यामुळे जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती एस. बी. कुलकर्णी यांना मिळाली (पुढे पुण्याचे कमिशनर झालेले) त्यावर्षी, पुढे गणिती म्हणून नाव मिळवलेले श्री. ए. बी. शहा हे मॅट्रिकला सर्वप्रथम आले. प्रा. दांडेकर मॅट्रिकचे वर्षाला असतानाच श्री. नानासाहेब नारळकर नुमविचे शालाप्रमुख बनले.

शाळेत असतांना "आम्ही संस्कृतात भाषणे करू शकत असू, नाटके बसवू शकत असू" असे दांडेकरांनी मला मुद्दाम सांगितले.

शालेय जीवनात लागलेल्या संस्कृतच्या आवडीमुळे पुढे कॉलेजमध्ये गेल्यावरही दांडेकर पंडित द. वा. जोग यांच्या घरी जाऊन संस्कृत शिकत असत.

या विषयाच्या ओघात दांडेकर म्हणाले, "माटे मास्तर, फणसे, सहस्त्रबुध्दे, जोग यांनी गुरूकुलासारख्या विद्यार्थी-परंपरा निर्माण केल्या. यात दोन गोष्टी असत. एक म्हणजे शिक्षकाने स्वतःच्या विषयाला वाहून घ्यायचे आणि दुसरे म्हणजे काही विद्यार्थी तयार करायचे. यात त्यांना घरी बोलावून त्यांच्याकडून अभ्यास करून घेणे तो तपासाणे यासारख्या गोष्टी येत असत. म्हणून फणसे, जोग यांना मी जो मान देईन तो मी नारळकरांना देणार नाही.

प्रि. नारळकरांबद्दल असे मत का असे मी विचारताच दांडेकर म्हणाले, "पुढे प्रि. नारळकर जेव्हा वेस्टर्न इंडिया कंपनीचे मुंबईतील मुख्य अधिकारी झाले तेव्हा मला विम्याची महती सांगून ते म्हणाले, 'तू विमा वीक.' तेथेच ते माझ्या मनातून उतरले. मी मनात म्हणालो यांचा दृष्टिकोन व्यापारी स्वरूपाचा आहे. हे ज्ञानाचे पुजारी नाहीत.

१९३७ साली दांडेकरांनी पुण्याच्या एस. पी. कॉलेजमध्ये शास्त्रशाखेच्या पहिल्या वर्षामध्ये प्रवेश घेतला. यावेळच्या एका गंमतीदार योगायोगाची आठवण सांगताना प्रा. दांडेकर म्हणाले, "एस. बी. कुलकर्णी, मी व मॅट्रिकला पहिले आलेले ए. बी. शहा असे तिघेही एकाच वर्गात होतो. व आमच्या जन्मतारखा अनुक्रमे ५, ६, व ७ जुलै १९२० अशा होत्या.

महाविद्यालयीन जीवनात पहिली चार-पाच वर्षे दांडेकराना फार खडतर परिस्थितीस तोंड द्यावे लागले. या काळामध्ये त्यांना स्वतःशिवाय कोणाचाच फारसा आधार नव्हता. बहुतेक वेळा शिकवण्या करूनच त्यांना आपले शिक्षण पार पाडावे लागले. "पण याबद्दल माझ्या मनात कसलीही खेदाची किंवा कडवटपणाची भावना नाही" असे त्यांनी मला मुद्दाम सांगितले.

कॉलेजच्या पहिल्या वर्षी ते माडीवाले कॉलनीतील एका भाड्याच्या खोलीत रहात होते. संघातील मित्रपरिवार नेहमी सोबतीला असेच. या वर्षी त्यानी किती कामे करावी? सकाळी दूध घातले, वर्तमानपत्रे टाकली आणि गणिताच्या शिकवण्याही केल्या. शिवाय भांडारकर रोडवर राहणाऱ्या वै. का. राजवाडे यांचे घरी मिल्टन, शेक्सपियर वाचून दाखवण्याचे व श्री. के. ना. वाटवे, साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे घरी लेखनिकाचे अशी कामे त्यांनी केली. या पैकी प्रत्येक कामाला महिना ५ रुपये या प्रमाणे दरमहा एकूण पंधरा रुपये

दांडेकरांना मिळत असत, व या मोबदल्यात जेवणाचा खर्च भागत असे. या संदर्भात दांडेकर म्हणाले, "गुजराथ लॉजमध्ये १४ रुपयात जेवणाची साठ कुपने मिळत असत व मी तेथेच जेवत असे. बादशाही बोर्डिंगचा दर महिना १७ (सतरा) रुपये असल्याने ते माझ्या सारख्यांना परवडणारे नव्हते. काही काळ एक पाव, व एक शेर दूध (दूधाचा दर ४ आणे शेर) यावर मी दिवस काढले आहेत.

दुर्दैवाची गोष्ट म्हणजे कॉलेजचे पहिले वर्ष दांडेकर पूर्ण करू शकाले नाहीत. कारण याच वर्षी मलेरियाने त्यांचा पिच्छा पुरवला. मित्र म्हणू लागले, "मलेरियातून सुटका हवी असेल तर पुणे सोड आणि मसूरकर महाराजांच्या शुध्दिकरण चळवळीत भाग घेऊन 'महाराज' हो." या गोष्टीवर अधिक भाष्य करताना दांडेकर म्हणाले, "या मानसिक अवस्थेत मी हातकणंगल्याजवळील एका डोंगरात एक महिना जाऊन राह्यलो. त्याच काळात मसूरच्या आश्रमातही जात असे."

दांडेकर पुढे म्हणाले, "कसेही असले तरी शिक्षण पूर्ण केले पाह्यजे हे मला कळत होते व म्हणूनच कॉलेजचे पहिले वर्ष वाया गेले तरी इंदूरला जाऊन इंटरच्या परीक्षेस बसण्याचा मी निश्चय केला व त्याप्रमाणे इंदूरला आलोही. इंटर आर्टस परीक्षेला एक्स्टर्नली बसण्याची सोय इंदूरात होती. संस्कृत, गणित व लॉजिक हे विषय घेऊन मी या परीक्षेस बसतो व पहिला आलो." इंटरच्या परीक्षेची फीपण दांडेकरांनी एका मॅट्रिकला बसणाऱ्या विद्यार्थ्याची शिकवणी करून मिळवली. तेथील स्वस्ताईबद्दल सांगताना दांडेकर म्हणाले, "सकाळच्या खाण्यासाठी एक आण्यात अदपाव जिलबी, व १ आण्यातच अदपाव दूध मिळत असे. दोघाजणांच्या एक महिन्याच्या डब्याला आठ रुपये पडत तर दोघाजणांच्या खोलीचे भाडे दरमहा पाच रूपये इतके अत्यल्प असे."

इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी दांडेकर अलाहाबादला आले. पण तेथील वसतिगृहात नबाबांची मुले रहात असत व वसतिगृहासाठी भराव्या लागणाऱ्या फॉर्ममध्ये बरोबर नोकर किती आणणार? असाही एक प्रश्न असे. इथे काही आपले जमणार नाही, हे ओळखून दांडेकरांनी अलाहाबादला रामराम ठोकला व त्याच वर्षी म्हणजे १९४० साली नागपूरला येऊन ते तेथील सिटी कॉलेजमध्ये दाखल झाले. येथेही त्याना शिकवण्या कराव्या लागल्याच. नागपुरातील सुप्रसिध्द चिटणवीस कुंटुंबातली एका मुलीस सर्व विषय शिकवण्याबद्दल त्यांना मासिक पंचवीस रूपये मिळत असत.

नागपुरांत असताना ते पोलिटिकल सायन्स या विषयाचे प्राध्यापक श्री. डी. के. गर्दे व होमिओपाथीचे डॉक्टर विदवदरल दफ्तरी यांचे संपर्कात आले. प्रा. गर्दे यांची एक गंमतीदार आठवण सांगताना दांडेकर म्हणाले, "गणपती उत्सवातील एका वादविवाद स्पर्धेत मी भाग घेतला होता व स्पर्धेचा विषय होता एकपलिकत्व का बहुपलिकत्व." बोलण्यासाठी दिलेला वेळ फक्त दहा मिनिटे होता. पण प्रा गर्दे यानी यासाठी तयारी म्हणून मला वेस्टरमार्क या लेखकाचे 'विवाहसंस्थेचा इतिहास' हे पुस्तक वाचायला सांगितले, आणि हे समजायलाच हवे असा आग्रह धरला. याच काळात दफ्तरी यांच्या घरी रोज दोन-दोन तास बसून दांडेकरांनी तेथे येणाऱ्या रूग्णांच्या रोगांसंबधीचे निदान आणि चिकित्सा यांचे पृथकरण करून दिले. १९४२ साली गणितातील रामानुजन प्राईज मिळवून दांडेकर बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. इकॉनॉमिक्समध्ये मात्र त्याना पहिल्या क्रमांकाचे मार्क मिळू शकले नाहीत.

दुर्दैवाने याच वर्षी त्यांच्या वडिलांचे पुण्यात बर्वे यांचे घरी निधन झाले.

बी. ए. नंतर एम. ए. करण्याचे दांडेकराचे मनात होते. व त्यांच्या सुर्दैवाने कलकत्याला त्यांचा आवडीचा स्टॅटिस्टिक्स हा विषय प्रथमच सुरू झाला होता. म्हणून स्टॅटिस्टिक्स हा विषय घेऊन एम. ए. करण्यासाठी दांडेकर कलकत्याला आले. याचवेळी एम. ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांचेसाठी उपलब्ध असलेली किंग एडवर्ड मेमोरियल फेलोशिपही त्याना मिळाली. ही शिष्यवृत्ती दरमहा साठ रुपयांप्रमाणे नऊ महिन्यासाठी दिली जात असे. प्रा. दांडेकर म्हणाले, "कलकत्यात बारा रुपयात एका माणसाचा महिन्याचा जेवणाचा व रहाण्याचा खर्च भागत असे." माणसाच्या १९४४ साली दांडेकर स्टॅटिस्टिक्स विषय घेऊन एम. ए. ची परीक्षा पहिल्या क्रमांकाने पास झाले. दांडेकरांची आपल्या भावी पत्नीशी ओळख कलकत्यातच झाली त्याही. कलकत्ता विद्यापीठातच स्टॅटिस्टिक्सचे शिक्षण घेत होत्या. पण दांडेकरांच्या एक वर्ष मागे होत्या.

यानंतर पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमधून पी. एच. डी.चा अभ्यास करण्यासाठी दांडेकर पुण्याला आले. पण एम. ए.चा रिझल्ट लागण्यात झालेल्या उशिरामुळे त्यांना किंग एडवर्ड मेमोरियल फेलोशिप पुनः मिळू शकली नाही व त्यामुळे त्यानी मुंबईला नागरी पुरवठा खात्यात दरमहा रु.५०० पगाराची नोकरी स्वीकारली. दांडेकरांनी यानंतर पी.एचडी.चा पुन कधीच प्रयल केला नाही. दांडेकर पी.एचडी नसताना ते डॉ. दांडेकर या नावानेच सर्वत्र कसे ओळखले जातात या माझ्या शंकेचे निरसन करताना त्यांच्या पली सौ.दांडेकर म्हणाल्या," पी.एचडी.साठी रिसर्च करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे प्रा. दांडेकर हे मार्गदर्शक होते. काही देशात अशा मार्गदर्शकांचे नावामागे 'डॉक्टर' अशी संज्ञा लावली जाते. त्या अर्थाने ते डॉक्टर आहेत. पण खरे म्हणजे निवृत्त झाल्यावरही ज्यांना प्राध्यापक ही पदवी स्वतःचे नावामागे लावता येत असे ते

गोखले इन्स्टिट्युटचे प्राध्यापक आहेत, अशा प्राध्यापकांना इंग्रजीत 'प्रोफेसर इमेरिटस्' असे म्हणतात. मुंबईला रेशनिंग खात्यात नोकरी स्वीकारण्यापूर्वी दांडेकरांचे पुण्यात जे थोडा काळ वास्तव्य झाले, त्या काळात ते त्यांचे शिक्षक पु. ग. सहस्रबुध्दे यांच्या घरी राहयले. पण पु. गं. चे महात्मा गांधीविषयी अनुदार उदगार काढणे दांडेकराना रूचेना व या प्रश्नावरून वादविवाद होऊ नयेत म्हणून दांडेकरांनी स्वेच्छेने पु. गं. चे घरातील मुक्काम हलवला.

रेशनिंग खात्यातील दरमहा पांचशे रुपयांची नोकरी सोडून १९४५ साली दरमहा १२५ रूपये + १५ रूपये महागाईभत्ता या पगारावर दांडेकर पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूटमध्ये दाखल झाले. १९४५ पासून १९८० मध्ये निवृत्त होईपर्यत सलग ३५ वर्षे दांडेकरांनी याच संस्थेत काम केले. गोखले इन्स्टिट्यूटचे संस्थापक डॉ. धनंजयराव गाडगीळ १९६५ साली या संस्थेच्या संचालक पदावरून निवृत्त झाल्यावर संस्था चालकांनी प्रा दांडेकरांची संचालक पदावर नेमणूक केली. काही मतभेद होऊन १९६७ साली त्यांनी संचालक पदाचा राजिनामा दिला आणि प्रा. माथूर यांची या पदावर नेमणूक झाली. पण प्रा. माथूर यांची कारकीर्द अल्पायुषी ठरून दोन वर्षातच संस्था-चालकांना पुनः दांडेकरानांच त्या पदावर आणावे लागले. प्रा. माथूर यांच्या दोन वर्षाच्या कालखंडात दांडेकरानी गोखले इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले.

अभ्यासात व संशोधनकार्यात रमणारे दांडेकर आज त्यानीच स्थापन केलेल्या "भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी" या संशोधनास वाह्यलेल्या संस्थेत अध्यक्ष म्हणून काम पाहतात. ही संस्था म्हणजे त्यांच्या परिश्रमाचे, उघमशीलतेचे व दूरदर्शीपणाचे प्रतिक आहे. सेनापती बापट रोडवरील 'अर्थबोध' या सुंदर वास्तूत या संस्थेचे कामकाज चालते. कोल्हापूरला १९७० साली स्थापन केलेली ही संस्था दांडेकरांनीच लोणावळ्यास हलवली. नॅशनल सॅम्पल सर्व्हे या संस्थेचे दांडेकर पहिले अध्यक्ष होते. त्याकामाचे मिळालेले मानधन, जनरल इन्शुअरन्स कॉर्पोरेशनला पीक-विम्याची योजना करून दिल्याबद्दल त्यांना मिळालेले एक लाख रुपये व काही उद्योगपतीकडून मिळवलेल्या देणग्या, या रकमेतून प्रा. दांडेकरांनी डॉ. मुळगावकरांची लोणावळ्यातील मालमत्ता आपल्या 'भारतीय अर्थविज्ञान वर्धिनी' या संस्थेसाठी चार लाख रुपयास खरेदी केली. या संस्थेमार्फत विविध क्षेत्रातील लोकांसाठी प्रशिक्षणाचे अभ्यासक्रम घेतले जात. रहाण्यासाठी सुसज्ज अशा पंचवीस खोल्याही बांधलेल्या होत्या. अशा बऱ्याच प्रशिक्षणाच्या संस्था निघाल्याने व राजकीय पुढाऱ्यांनाही असल्या प्रबोधनात रस नसल्याचे आढळून आल्याने, दांडेकरांनी ही मालमत्ता H.D.F.C. ला एक कोटी रुपयास विकून टाकली व संस्थेचे पुण्याला स्थलांतर झाले. "शासकीय अनुदान न मिळणारी माझी ही संस्था आज आर्थिकदृष्ट्या पूर्णतया स्वयंपूर्ण आहे" असे मोठ्या अभिमानाने त्यांनी मला सांगितले. सात-आठ मातब्बर संशोधक मंडळी, उत्तम लायब्ररी, व कम्प्यूटरसहित सर्व आवश्यक साधनांची उपलब्धता यामुळे दांडेकरांची ही संस्था पुण्याचे भूषण ठरावी अशा योग्यतेची झाली आहे. भारताच्या विविध क्षेत्रांत गेल्या ४०/५० वर्षात झालेल्या प्रगतीची माहिती देणारे एक त्रैमासिक ही संस्था प्रकाशित करते.

दांडेकरांच्या सुविज्ञ पत्नी सौ. कुमुदिनी दांडेकर याही गोखले इन्स्टिट्यूटमध्येच संशोधनविषयक काम करीत असत. सुप्रसिध्द लेखिका मालतीबाई बेडेकर, कृष्णाबाई मोटे यांच्या त्या भगिनी.

प्रा. दांडेकरांचे थोरले चिरंजीव 'निर्जर' हे फिजिसिस्ट असून गेली २४ वर्षे त्यांचे वास्तव्य अमेरिकेत आहे. धाकटे चिरंजीव कार्तिक हे इंजिनियर असून तेही गेली चौदा वर्षे अमेरिकेतच आहेत. प्रा. दांडेकरांची आजची दिनचर्या पहाटे पांच ते रात्री ९ अशी असते. बहुतेक वेळ ते आपल्या संस्थेतच काम करीत असतात. आपल्या प्रकृतीबद्दल बोलतांना ते म्हणाले, "पायाचे स्नायूत थोडा थकवा जाणवू लागलाय, या पेक्षा इतर काही तक्रार नाही." प्रा. दांडेकरांनी चीन सोडून जवळजवळ सर्व प्रमुख देशांचा प्रवास केला आहे.

असे हे प्रा. दांडेकर. संशोधनात रमून गेलेले, मोठ मोठाली कामे पार पाडूनही त्याचा गवगवा न करणारे, जनसामान्याच्या राहणीशी मिळतीजुळती अशी साधी राहणी मुद्दाम जाणीवपूर्वक स्वीकारणारे, त्यांच्या विषयी प्रेम व करूणा बाळगणारे, प्रागतिक विचारांचे आणि भारताच्या उज्ज्वल भवितव्याविषयी मनात कसलाही संदेह नसलेले. अशा माणसांच्या आयुष्याचा मागोवा घेणे म्हणजे एक विलक्षण प्रत्ययकारी अनुभव असतो.

प्रा. दांडेकरांशी केलेला प्रश्नोत्तररूपी संवाद

**मी - आपण शालेय जीवनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघात जात होता. मग काय करणाने संघ सोडलात?**

प्रा. दांडेकर - ज्या वयात ज्या गोष्टी केल्या पाहिजेत त्या सर्व मी केल्या. लहानपणी ज्यांनी संघ, दल किंवा स्काऊट या सारखे काही केले नाही त्यांना त्यानी आयुष्यात काय गमावलय याची कल्पनाच नाही. मी संघ सोडण्याचे कारण म्हणजे संघाच्या एका बौध्दिकात मी प्रश्न विचारले व ते कोणास आवडले नाही संघ व कम्युनिस्ट पार्टी हे बुध्दिबंदाचे गट आहेत असे मला वाटते. तेथे मठाधिपतींचे राज्य असते.

**मी - तुम्ही व श्री यशवंतराव चव्हाण यांचे दरम्यान एकाच व्यासपीठावर काही शाब्दिक वाद झाला होता. काय होता तो वाद?**

प्रा. दांडेकर - मला वाटते बँक ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री.चि.वि. जोग याच्या एकसष्ठीनिमित्त आयोजित केलेला तो समारंभ होता. मी माझ्या भाषणात सहज म्हणून गेलो की पुसद किंवा कराडहून माणसे मुंबईला गेली की नंतर त्याना आपल्या भागाची आठवण रहात नाही व ते मुंबईशी समरस होतात. श्री यशवंतरावाना माझे हे उदगार लागले व तेही त्यांच्या भाषणात म्हणाले की "आपण कोणाच्या खुर्चीवर बसलो आहोत याचे भान दांडेकराना आहे असे वाटत नाही" (म्हणजे धनंजयराव गाडगिळांच्या खुर्चीवर आता दांडेकर बसलेत व त्याना त्याचा विसर पडलाय.) पण यशवंतराव खरोखरच मोठ्या मनाचे गृहस्थ होते व हा वाद त्या सभेबरोबरच संपला. त्यानंतर मी जेव्हा दिल्लीला त्यांच्या घरी गेलो तेव्हा पूर्वीच्याच आपुलकीने त्यानी माझे स्वागत केले.

**मी - आपण स्पष्टवक्तेपणाकरता प्रसिध्द आहे. त्याचे एकादे उदाहरण -**

प्रा. दांडेकर - चित्पावन विद्यार्थ्यांसाठी असणारी दरमहा पांच रुपयांची शिष्यवृत्ती मिळावी म्हणून मी सुप्रसिध्द वकिल श्री ब.ना. उर्फ बाबा भिडे यांना भेटलो. ते म्हणाले, "संध्या करतोस का?" मी म्हणालो, "माझी मुंजच झालेली नाही. तेव्हा संध्या कशी करणार?" त्यावर ते म्हणाले, "मग तुला शिष्यवृत्ती मिळणार नाही". यावर ताडकन मी त्यांना म्हणालो, "म्हणजे संध्या करण्यासाठी तुम्ही शिष्यवृत्ती देता अभ्यास करण्यासाठी नाही."

**मी - आधुनिक अर्थशास्त्रावरील लेखन समजण्यासाठी आता गणित व स्टॅटिस्टिक्स यांचे ज्ञान फार आवश्यक झालय. म्हणून पदवी पातळीवर शिकवला जाणारा अर्थशास्त्राचा अभ्यासक्रम बदलायला नको का?**

प्रा. दांडेकर - अर्थशास्त्र समजण्यासाठी जेवढे गणिताचे व संख्याशास्त्राचे ज्ञान आवश्यक आहे त्यांचा अंतर्भाव अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमातच केला पाहयजे. असा अभ्यासक्रम तयार करून मी तो पुणे विद्यापीठाकडे सुपूर्द केला आहे.

**मी - मला वाटते भारत सरकारच्या सध्याच्या आर्थिक शिथिलीकरणाच्या धोरणातून गरीब वर्गाचे काही काळ तरी हाल होणार. यावर काय उपाय सुचवाल?**

प्रा. दांडेकर - यासाठी सबसिडया, नियंत्रणे यासारख्या गोष्टी काढून टाकून एक भूसेना उभी केली पाह्यजे. भूसेना हा पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यातच वापरलेला शब्द आहे. ही सेना रोजगार नसलेल्या लोकांसाठी असेल. व हे लोक केंद्र सरकारचे नोकर असतील जिल्हा परिषदा व राज्य सरकारे ठरवतील ती कामे या भूसेनेकडून पार पाडून घ्यावी. काम करणाऱ्या भूसेनेलाच पगार दिल्याने भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होऊ शकेल. या पध्दतीने विकासाची खूप कामे पार पाडता येतील.

**मी - पोथिनिष्ठ तत्वज्ञानापेक्षा जे तत्वज्ञान देशाचा जलद विकास घडवून आणील तेच वापरावयाचे या पध्दतीने आज चीनमध्ये कामे चालू आहेत. त्याबद्दल काही सांगणार?**

प्रा, दांडेकर - फक्त एकच गोष्ट सांगतो व ती म्हणजे चीनमध्ये आता नोकरीतील कोणतीच जागा कायम स्वरूपाची ठेवलेली नाही. कोणत्याही पदावर नेमणूक होते ती फक्त सहा वर्षासाठी असते. मग प्रत्येकास पुनः निवडीच्या प्रक्रियेतून जावे लागते.

**मी - ज्योतिषाचाही तुमचा अभ्यास आहे. काय आहे या शास्त्राबद्दलचे तुमचे मत?**

प्रा.दांडेकर - या क्षेत्रातील मंडळी जे दावे करतात त्यांची संख्याशास्त्रीयदृष्ट्या तपासणी झाली पाह्यजे. हे लोक खऱ्या ठरलेल्या अंदाजांची जाहिरात करतात. पण खोट्या ठरलेल्या अदांजाबद्दल ब्र काढीत नाहीत. मी घटस्फोटीत लोकांच्या किंवा मातृनाशाच्या बऱ्याच कुंडल्या जमवल्या आहेत. पण त्यांच्या संख्याशास्त्रीय अभ्यासावरून काही ठाम निष्कर्ष निघाले नाहीत.

**मी - विरंगुळा म्हणून काही वेगळे वाचन किंवा लेखन करता?**

प्रा. दांडेकर - अवांतर वाचन जम नाही आणि केवळ करमणूक म्हणून मी वाचन करीत नाही. ज्या गोष्टीत मला स्वतःला काही करता येत नाही त्या गोष्ट करणे आवडत नाही. वेगळे लेखन म्हणा तर अगदी बारीक सारीक तपशिलासह एक सिने-पटकथा, इंग्रजीत लिहली होती परवाच श्री. राम गबाले ती घेऊन गेलेत पाहू काय होते ते.

**मी - मी परवा अर्थबोधमध्ये तुम्हांला भेटायला आलो तर "दांडेकरसाहेब कम्प्यू रूममध्ये काम करतायत असे मला सांगण्यात आले. केव्हा व कसे मिळवलेत कम्प्यूटर वापराचे ज्ञान?**

प्रा. दांडेकर - तुमच्यासारखेच आश्चर्य माझ्या अमेरिकेतील नातवाला वाटले. अमेरिकेत माझ्या मुलाचे घरी कम्प्यूटरवर मला काम करताना पाहून माझा पाच वर्षाचा नातू म्हणाला, "आजोबा तुमच्या वयाकडे पाहता कोणाचा विश्वास बसणार नाही, की तुम्हाला कम्प्यूटरचे एवढे ज्ञान आहे." पुस्तके वाचून व कॉम्प्यूटरचा प्रत्यक्ष वापर करूनच मी कम्प्यूटर वापराचे ज्ञान मिळवले."

माझे प्रश्न संपले होते. प्रा. दांडेकरांचा निरोप घेऊन घरी परतताना एकच विचार मनात होता. उच्च ध्येयाने प्रेरित होऊन झपाटल्याप्रमाणे कामे करणाऱ्या प्रा. दांडेकरांसारख्या मंडळींची संख्या वाढली तर भारताचा भाग्योदय दूर नाही.

**एन. डी. आपटे**
**१९८०, सदाशिव पेठ,**
**पुणे - ३०**



श्री वि.म. दांडेकरांचा मृत्युदिन
३० जुलै १९९५